MHKO180004072012

**नियमीत दिवाणी दावा क्र.१९९/२०१२ मधील**
**निशाणी क्र.१२९ खालील आदेश.**
**(गुरुनाथ जोशी वि. संजय जोशी आणि इतर)**

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा दावा मिळकतीचे वाटप व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतेवेळी वादी यांनी दाव्यामधल्या दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र.३ ते ७ यांना दाव्यामध्ये समाविष्ठ केले आहे. प्रतिवादी क्र.३ ते ७ हे वादी आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कुटूंबाचे सदस्य नाहीत व त्यामुळे, प्रतिवादी क्र.३ ते ७ यांचा जोशी कुटूंबाच्या हिश्यात कोणताही संबंध येत नाही. सदरची बाब प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कैफियतीमध्ये नमूद करण्याकरीता प्रतिवादी क्र.१ व २ यांना प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ व २ यांना दावा मिळकतीत येणारा प्रत्येकी १/३ हिस्सा प्रतिवादी क्र.१ व २ यांना मिळावा व त्यासाठीचे न्यायालयीन शुल्क भरण्यास तयार असल्याबाबतचा मजकूर प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्यांच्या कैफियतीमध्ये नमूद करण्याकरीता प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कथनानुसार, वाद विषयाचे संपूर्ण निराकरण करण्याकरीता कैफियतीमध्ये संबंधीत दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे. तसेच, सदर नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केली आहे.

०३. वादी यांनी निशाणी क्र.१३० वर त्यांचे म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ व २ यांना दावा मिळकती मधील त्यांचा हिस्सा हवा असल्यास त्यांनी प्रतिदावा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जातील मागणी कायदेशीर नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे. प्रतिवादी क्र.३ ते ७ यांना प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करण्याची वेळोवेळी संधी देवून देखील सदर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ ते ७ यांच्या म्हणण्याशिवाय गुणानुगूणावर पुढे चालविण्यात येत आहे.

०४.	उभयपक्षाच्या विद्यमान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. दोन्ही पक्षांतर्फे त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद करण्यात आला.

०५.	दावा, कैफियत, प्रस्तुत अर्ज व वादी यांनी निशाणी क्र.१३० वर दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरण प्रलंबित असतेवेळी वादी यांनी प्रतिवादी क्र.३ ते ७ यांना प्रस्तुत दाव्यामध्ये समाविष्ठ केल्यामुळे दावा मिळकतीतील सदर प्रतिवादींच्या आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या हिश्यासंबंधी आवश्यक तो मजकूर प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कैफियतीमध्ये नमूद करण्याकरीता प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ व २ यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र.१ व २ यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज एक हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पुढील तारखेपर्यंत कैफियतमध्ये अर्जातील नमुद दुरुस्ती करुन कैफियतीची दुरुस्ती प्रत प्रस्तुत दाव्यात दाखल करावी. तसेच, दुरुस्त कैफियतीची एक प्रत वादी यांना द्यावी.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खर्चाची रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) वादी यांना द्यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.02.11 16:29:50 +0530

दिनांक : १०.०२.२०२५	(बाळासाहेब श्री. गायकवाड)

कुरुंदवाड.	दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,

कुरुंदवाड.